# बृहन्मुंबई पोलीस
## गुन्हे शाखा,
## सायबर गुन्हे, गु.अ.वि., मुंबई
दुरध्वनी क्र. ०२२-२६५२९९२६
ईमेल आयडी :-dcpcybercrime.mum@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट क्र. :- ......./२०२४ दिनांक :- ०९/०७/२०२४

### सायबर पोलीस ठाणे, पश्चिम विभाग, गु.शा., बीकेसी, मुंबई

### टास्क फ्रॉडच्या नावाखाली फसवणुक करणाऱ्या टोळीस राज्य-ओडिशा येथून अटक केलेबाबत

| | | |
|---|---|---|
| १ | पोलीस ठाणे | सायबर पोलीस ठाणे, पश्चिम विभाग, मुंबई |
| २ | गु.नो.क्र. व कलम | ०७/२०२४ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२० ब भादंवि सह कलम ६६ (क), ६६(ड) माहिती व तंत्रज्ञान अधिनियम |
| ३ | गुन्हा घडला दि. व वेळ | दि.१०/१२/२०२३ ते १२/०१/२०२४ या कालावधी दरम्यान |
| ४ | गुन्हा दाखल दि. व वेळ | दिनांक २४/०२/२०२४ रोजी १२:०० वा. |
| ५ | अटक आरोपी | १) प्रमोदकुमार रविंद्र बेहेरा, वय २६ वर्षे<br>२)राकेशकुमार हरिराम चौधरी वय २५ वर्षे,<br>३) सूर्वेदू निरंकर दास वय ३० वर्षे<br>४) जयदिप अमरकुमार परिडा वय २४ वर्षे,<br>५) मनोजकुमार अदिचरम राउत वय २९ वर्षे,<br>दिनांक ३०/०६/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा अटक करण्यात आली. |
| ६ | फसवणुक केलेली मालमत्ता | रू. ४३,६२,७३१/- ची ऑनलाईन फसवणूक |
| ७ | हस्तगत मालमत्ता | रू. ६,९९,३९७/- इतकी रक्कम विविध बॅंक खात्यात फ्रिज<br>अटक आरोपींकडून एकूण ११ मोबाईल, ४७ वेगवेगळया बॅंकांचे पासबुक, २३ वेगवेगळया बॅंकेचे व खात्याचे चेकबुक, १०४ विविध बॅंकांचे ए.टी.एम.कार्ड, १० मोबाईल सिमकार्ड, ०१ बॅंक मॅनेजर स्टॅम्प हस्तगत |
| ८ | तपासी अधिकारी | पो.नि. सविता शिंदे, स.पो.नि. पुनम जाधव |

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिगत-</u> फिर्यादी यांना मोबाईल व्हॉटस ॲपद्वारे संपर्क करून EADCOSMOS SOCIAL MEDIA MARKETING COMPANY' या कंपनीच्या ह्युमन रिसोर्स डिपार्टमेंट मधून बोलत असल्याचे सांगून पार्ट टाईम जॉब देणार असल्याचे सांगितले. त्यामध्ये फिर्यादी यांना इंस्टाग्राम अकाऊंटसच्या यु. आर. एल. लिंक्स व युझर-नेम पाठविले. फिर्यादीना सदर इंस्टाग्राम अकाऊंटला Follow करुन त्याचे स्क्रिनशॉटस पाठविण्यास सांगून टास्क पुर्ण करण्यास सांगितले. फिर्यादी यांनी त्यांनी दिल्याप्रमाणे टास्क पुर्ण केल्यानंतर आरोपीतांनी फिर्यादी यांना यापुढील टास्क हे प्रिपेड असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी वेळोवेळी टास्क पुर्ण करण्यासाठी फिर्यादी यांना भरघोस नफा देण्याचे अमिष देवून प्रत्येक टास्क करतेवेळी वेगवेगळी कारणे देवून वेगवेगळ्या बॅंक खात्यांमध्ये रुपये ४३,६२,७३१/- एवढी रक्कम गुंतविण्यास सांगितले व टास्क पुर्ण केल्यानंतर देखिल फिर्यादीने गुंतविलेली मुळ रक्कम तसेच त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यावर मिळणारा

नफा यापैकी कोणतीही रक्कम फिर्यादीला न देता फिर्यादीची एकूण रुपये ४३,६२,७३१/-.इतक्या रक्कमेची आर्थिक फसवणुक केल्याने गु.र.क्र. ०७/२०२४ कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१,१२०ब भादवि सह कलम ६६क, ६६ड माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००८ अन्वये सायबर पोलीस ठाणे, पश्चिम विभाग, बी.के.सी., मुंबई येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

नमूद गुन्हयाचा तांत्रिक व पांरपारिक पध्दतीने तपास करुन गुन्हयातील आरोपीतांविषयी माहिती प्राप्त करण्यात आली. गुन्हयातील आरोपी हे भद्रक, ओडीशा येथील असल्याचे दिसून आल्याने मा. वरिष्ठांच्या परवानगीने पश्चिम विभाग, सायबर पोलीस ठाणे येथील स.पो.नि. पुनम जाधव, स.पो.नि. नितीन गच्चे, पो.शि. केशव तकीक, पो.शि. संग्राम जाधव व पो.शि.अभिजीत देसाई असे पथक सदर ठिकाणी रवाना झाले. सदर ठिकाणी कौशल्यपूर्वक तपास करून स्थानिक पोलीसांच्या मदतीने सापळा रचून गुन्हयातील वर नमूद पाहिजे आरोपीस दिनांक ३०/०६/२०२४ रोजी पहाटे ०६.०० वा अटक करण्यात आली. अटक आरोपींच्या ताब्यातून ११ मोबाईल, ४७ वेगवेगळया बॅंकांचे पासबुक, २३ वेगवेगळया बॅंकेचे व खात्याचे चेकबुक, १०४ विविध बॅंकांचे ए.टी.एम.कार्ड, १० मोबाईल सिमकार्ड, ०१ बॅंक मॅनेजर स्टॅम्प हस्तगत असा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास चालु आहे.

सदरची यशस्वी कामगीरी मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसाळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशीकुमार मिना, मा. पोलीस उप आयुक्त (सायबर गुन्हे) श्री. दत्ता नलावडे यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहायक पोलीस आयुक्त (सायबर) श्री. अबुराव सोनावणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक (पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाणे) श्री. दत्ताराम चव्हाण यांचे नियंत्रणाखाली पोलीस ठाणेचे पो.नि. सविता शिंदे, स.पो.नि. पुनम जाधव, स.पो.नि. नितीन गच्चे, पो. ह. क्र. ०६१६३२/प्रशांत भुवड, पो.शि.क्र. ०९०८०७ /केशव तकिक, पो.शि.क्र. ११०३२३ /संग्राम जाधव, पो शि.क्र. १५१२५९/अभिजीत देसाई यांनी पार पाडली आहे.

मुंबई पोलीसांच्या सायबर गुन्हे शाखेमार्फत जेष्ठनागरीक, जनसामान्य लोकांना विनंती आहे की, अशा प्रकारे ऑनलाईन फसवणुक करणाऱ्या भामटयां पासुन सावध रहावे. मोबाईल, फोनवरील अनोळखी व्यक्तीला आपला बॅंक अकाउंट नंबर, पासवर्ड, ओ.टी.पी., केवायसी, डेबीट कार्ड क्रमांक, आधारकार्ड क्रमांक, पॅनकार्ड क्रमांक अशी गोपनीय माहिती मागत असतील तर फोन त्वरीत कट करून नजिकच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. अनोळखी व्यक्तींच्या सांगण्यावरुन कोणतेही मोबाईल ॲप डाउनलोड करू नये तसेच लिंक क्लिक करू नये.

जर आपल्या सोबत सायबर संदर्भात गुन्हा घडल्यास तात्काळ सायबर हेल्प लाईन क्र. १९३० किंवा आपले नजिकच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.

**# cybersafemumbai**
**Report Cyber Crime On Helpline 1930 OR https://cybercrime.gov.in**